## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रोच्या भुयारीकरणाचा ३६ वा टप्पा यशस्वी

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाचा सहार रोड ते आंतरराष्ट्रीय विमानतळ (सीएसएमआयए-टी १) स्थान हा दीड किलोमीटर लांबीचा ३६ वा भुयारीकरणाचा टप्पा आज यशस्वीरित्या पूर्ण झाला. याबरोबरच पॅकेज-६ मधील एकूण ४.४ किलोमीटरचे भुयारीकरण शंभर टक्के पूर्ण झाले आहे. मेट्रो-३ च्या पॅकेज-६ मधील दोन स्थानके आंतर्देशीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनलवर आहेत. या दोन्ही स्थानकांना एअरपोर्ट टर्मिनलशी जोडले जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांचा विमानतळापर्यंतचा प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे असे याप्रसंगी मुंबई मेट्रो रेल महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक रणजीतसिंह देओल यांनी सांगितले. तापी-१ आणि तापी-२ या टनेल बोअरिंग मशिन्सद्वारे १५ महिन्यांमध्ये हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.



### एक लाखावर व्हॅक्सिनेशन पूर्ण, पाच लाख डोस उपलब्ध

# एकालाही साईड इफेक्ट नाही



## पालिकेचे लसीकरण वेगात

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - मुंबईत पालिकेच्या माध्यमातून १६ जानेवारी रोजी कोरोना लसीकरणाला सुरुवात झाल्यानंतर आतापर्यंत १ लाख ७ हजार ७२५ जणांना लसीकरण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत पहिल्या टप्प्यातील आरोग्य कर्मचारी आणि दुसऱ्या टप्प्यातील फ्रंटलाईन वर्करला लस देण्यात येत आहे.

लाखो जणांना लसीकरण झाल्यानंतर आतापर्यंत एकालाही साईड इफेक्ट झालेला नाही. लसीकरण वेगाने सुरू असून पालिकेकडे ५ लाख ३२ हजार १०० डोस उपलब्ध आहेत.

आतापर्यंत झालेल्या लसीकरणात १२ फेब्रुवारीपर्यंत ८७,४१६ आरोग्य कर्मचारी व २०,३०९ आघाडीवर काम करणाऱ्या कर्मचा-यांचा समावेश आहे. लाभार्थ्यांच्या संख्या व सुलभतेसाठी १४ अतिरिक्त लसीकरण केंद्र कार्यान्वित करण्यात आली व या केंद्राची क्षमता दरदिवशी १२,५०० लाभार्थ्यांना लसीकरण करण्याइतपत वाढवण्यात आली आहेत.

दरम्यान, पहिल्या टप्प्यात ९ अद्ययावत लसीकरण केंद्र कार्यान्वित करण्यात आली. १६ जानेवारी रोजी पहिल्या दिवशी १,९५७ लाभार्थ्यांना लसीकरण करण्यात आले. ५ फेब्रुवारी रोजी लसीकरणाचा दुसरा टप्पा कोविड आघाडीवर काम करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांसाठी (FLW) कार्यान्वित करण्यात आला. तर ६ फेब्रुवारी रोजी पोलीस दलासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली. दरम्यान, पालिकेने पहिल्या व दुसऱ्या टप्प्यासाठी २३ लसीकरण केंद्रांमध्ये १२५ बूथ कार्यान्वीत केलेली आहेत. आवश्यकतेनुसार त्यात टप्प्याटप्याने वाढ करण्यांत येणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.



उद्या सोमवारपासून माघी गणेशोत्सवास सुरुवात होत असून आपले लाडके बाप्पा मंडपात विराजमान होणार आहेत. कफ परेड येथील आंबेडकर नगरचा बाप्पा मंडपाकडे रवाना होत आहे.
( छाया : संदीप पागडे )

### मुंबई, ठाणे, पालघर, वसई-विरारमधील नशेबाजांसाठी आणलेला

# विक्रोळीत पकडला साडेतीन कोटींचा अठराशे किलो गांजा

### अमली पदार्थविरोधी पथकाची मोठी कारवाई

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - मुंबई, ठाणे, पालघर, वसई-विरारमधील नशेबाजांसाठी ओडिशावरून आलेला अठराशे किलो गांजा अमली पदार्थविरोधी कक्षाच्या घाटकोपर युनिटने विक्रोळीत पकडला. एका टेम्पोतून गोण्यांमध्ये भरून हा गांजाचा साठा मुंबईत आणण्यात आला होता. तो भिवंडी येथील गोदामात साठा करण्यासाठी नेण्याआधीच पोलिसांनी जप्त केला. तीन कोटी ६० लाख किमतीचा हा गांजाचा साठा असून या कारवाई ड्रग्ज तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

ओडिशाहून एक टेम्पो भरून गांजा मुंबईत आणण्यात येत असल्याची खबर घाटकोपर युनिटला मिळाली होती. त्यानुसार उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी निरीक्षक लता सुतार यांच्या नेतृत्वाखाली एपीआय विशाल खैरे, उपनिरीक्षक सचिन पालवे, अशोक तपासे व पथकाने विक्रोळी येथील पूर्व द्रुतगती महामार्गावर सापळा रचला. मिळालेल्या माहितीनुसार सदर टेम्पो तेथे येताच पोलिसांनी तो थांबवून टेम्पोतील गोण्यांची तपासणी केली असता त्यात गांजा मिळून आला. हा गांजा घेऊन येणाऱ्या आकाश यादव आणि दिनेशकुमार सरोज या दोघांना पोलिसांनी अटक केली. ओडिशा येथील रहिवासी असलेला लक्ष्मीकांत प्रधान हा टोळीचा प्रमुख असून त्याच्या सांगण्यानुसार विविध ठिकाणी गांजा विकला जातो. त्याच्याच सांगण्यावरून जप्त केलेला तब्बल तीन कोटी ६० लाखांचा गांजाचा साठा मुंबई व आजूबाजूच्या जिल्ह्यात विकण्यासाठी आणण्यात आला होता आणि तो भिवंडी येथील गोदामात ठेवण्यात येणार होता. पण वेळीच पोलिसांनी कोट्यवधीचा गांजा पकडण्याची मोठी कामगिरी केली. ही टोळी एका महिन्याला सुमारे चार टन गांजाची विक्री करते असे तपासात समोर आल्याचे सहआयुक्त मिलिंद भारंबे यांनी सांगितले.



***खारमध्ये एक किलो मनाली चरस पकडला***

*अमली पदार्थविरोधी कक्षाच्या घाटकोपर युनिटने तीन कोटी ६० लाखांचा गांजा पकडला असतानाच वांद्रे युनिटने खार येथे दोघा तस्करांना पकडून त्यांच्याकडून एक किलो १०० ग्रॅम वजनाचा मनाली चरसचा साठा जप्त केला. शेल्डन ॲलेक्स डिसिल्वा आणि नंदू कश्यप अशी त्या दोघा तस्करांची नावे आहेत. ३३ लाख किमतीचा हा मनाली चरसचा साठा पश्चिम उपनगरातील उच्चभ्रू नशेबाजांना विकण्यासाठी त्यांनी आणला होता.*

### शाळांना १०० टक्के निकालाचे टेन्शन

# परीक्षेच्या तयारीसाठी दहावीच्या विद्यार्थ्यांना शाळेत शिकवणी

### उजळणी, प्रॅक्टिकल्स, प्रश्नपत्रिका सराव, अवघड प्रश्नांची तयारी



मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - १०० टक्के निकालाची परंपरा राखण्यासाठी मुंबईतील बऱ्याच शाळांनी दहावीच्या विद्यार्थ्यांची शाळेत विशेष शिकवणी सुरू केली आहे. मुंबई महापालिकेने अजूनही शाळा, कॉलेज सुरू करण्यास परवानगी दिलेली नाही. मात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी शाळांनी विद्यार्थ्यांना शाळेत बोलावण्यास सुरुवात केली आहे. परीक्षेच्या तोंडावर सकाळच्या सुमारास दोन ते तीन तास शाळा भरत असून उजळणीवर भर दिला जात आहे. तसेच प्रॅक्टिकल्स, प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव, अवघड प्रश्नांची तयारी तसेच विद्यार्थ्यांचे काही प्रश्नही सोडविले जात आहेत.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई महापालिका वगळता राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये २३ नोव्हेंबरपासून नववी ते बारावीचे वर्ग सुरू झाले आहेत. दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेला दोन महिने शिल्लक राहिले असतानाही महापालिकेकडून शाळा सुरू करण्याविषयी कोणताच निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे काही शाळांनी विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तसेच शाळेची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखण्यासाठी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने शाळेत बोलावण्यास सुरुवात केली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्यासाठी शाळांनी १०-१० विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना दिलेल्या वेळेत शाळेत येण्यास सांगितले आहे.

**फक्त शाळा, कॉलेजसाठीच कोरोना?**

मुंबई परिसरात कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने शाळा, कॉलेज बंद आहेत. पण कोरोनाचा प्रादुर्भाव फक्त शाळा आणि कॉलेजसाठीच आहे का, असा सवाल शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी केला. परीक्षेच्या दृष्टीने महापालिकेने निदान दहावीचे नियमित वर्ग भरवण्यास परवानगी दिली पाहिजे, अशी मागणीही मोरे यांनी केली. तसेच सध्या शाळेत येणाऱ्या दहावीच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या पालकाकडून पाल्याला शाळेत पाठविण्यासंबंधीचे हमीपत्रही शाळेकडून घेतले जात असल्याचे ते म्हणाले.

***परीक्षेसंबंधी काम करण्यास परवानगी***

*केंब्रिज बोर्ड वगळता इतर सर्वच शिक्षण मंडळांना दहावी, बारावीच्या परीक्षेसंबंधी कामकाजास परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार शाळा विद्यार्थ्यांच्या पूर्व परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा घेऊ शकतात, पण प्रत्यक्षात नियमित वर्ग भरवण्यास अजून तरी परवानगी दिलेली नाही.*

***▮ महेश पालकर, शिक्षणाधिकारी, मुंबई महानगरपालिका***

## पश्चिम उपनगरात ड्रग्ज पुरविणाऱ्या टोळीचा म्होरक्या गजाआड

**तीन किलो २०० ग्रॅम चरससह पकडला**

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - पश्चिम उपनगरातील नशेबाजांना चरसचा साठा उपलब्ध करणाऱ्या टोळीचा म्होरक्या गुन्हे शाखा युनिट-१२ च्या हाती लागला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून एक कोटी दोन लाख रुपये किमतीचा चरसचा साठा जप्त केला होता. शुक्रवारीच पोलिसांनी या आरोपीच्या साथीदाराला एक किलो ८०० ग्रॅम चरस साठ्यासह रंगेहाथ पकडले.

युनिट-१२ चे प्रभारी निरीक्षक महेश तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक शुक्रवारी कुरार परिसरात गस्त घालत असताना त्यांना किसन गौड ऊर्फ साठे व त्याचा साथीदार पोट्या हे बॅग घेऊन जाताना त्यांच्या नजरेस पडले. तेव्हा पोलिसांनी दोघांना हटकले असता किसन अरुंद गल्लीचा फायदा घेत पळाला होता. तर पोट्याला एक किलो ८०० ग्रॅम चरस साठ्यासह पोलिसांनी रंगेहाथ पकडले होते. त्यानंतर तावडे व पथकाने शोधमोहीम राबवून पसार झालेल्या किसनला तीन किलो २०० ग्रॅम चरससह पकडले. एक कोटी दोन लाख ४० हजार इतकी या चरसची किंमत असून किसन हा पश्चिम उपनगरात ड्रग्ज पुरविणाऱ्या टोळीचा म्होरक्या असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## ८० लाख ग्राहकांनी दहा महिन्यांत वीज बिलाची फुटकी कवडीही भरली नाही

### महावितरणचा थकबाकीचा आकडा ७१ हजार कोटींवर

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - अबब... महावितरणच्या तब्बल ८० लाख ३२ हजार वीज ग्राहकांनी गेल्या दहा महिन्यांत वीज बिलापोटी फुटकी कवडीही भरली नसल्याचे समोर आली आहे. थकीत वीज बिल भरण्यासाठी महावितरण ग्राहकांना वारंवार विनवणी करत आहे. वेगवेगळ्या सवलती जाहीर केल्या असल्या तरी त्याचा ग्राहकांवर मात्र कोणताच परिणाम होत नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे महावितरणच्या एकूण वीज बिल थकबाकीचा आकडा तब्बल ७१ हजार कोटींवर पोहचला असून यामध्ये ४५ हजार कोटींची मूळ थकबाकी आणि २६ हजार कोटी रुपये व्याज आणि दंडाची रक्कम आहे.

महावितरणचे राज्यात जवळपास अडीच कोटी वीज ग्राहक असून त्यामध्ये १ कोटी ८३ लाख घरगुती तर ४५ लाख कृषिपंपधारक आहेत. उर्वरित औद्योगिक, वाणिज्यिक गटातील ग्राहक आहेत. कोरोना महामारीच्या काळात आलेले आर्थिक संकट आणि महावितरणने वाढीव वीज बिले पाठवल्याचे कारण देत ग्राहक वीज बिल भरण्याचे टाळत आहेत. त्या पार्श्वभूमीवर महावितरणन तीन टप्प्यांत वीज बिल भरणे, वीज बिलातील व्याजाच्या रकमेत सवलत जाहीर केली आहे. तरीही गेल्या एप्रिलपासून आजपर्यंत जवळपास ३८ लाख २१ हजार घरगुती वीज ग्राहकांना आपल्या वीज बिलापेटी एक रुपयाही भरलेला नाही. तसेच वीज बिल न भरणाऱ्यांमध्ये साडेतीन लाख वाणिज्यिक तर ५२ हजार औद्योगिक ग्राहकांनीही वीज बिलाची फुटकी कवडीही भरलेली नाही. तसेच जवळपास ४० लाख कृषिपंपधारकांनीही आपले बिल भरलेले नाही. त्यामुळेच महावितरणच्या वीज बिल थकबाकीचा डोंगर ७१ हजार कोटींवर पोहोचला आहे.

## मुंबई हायजवळ जहाजाला आग

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - मुंबई हायजवळील समुद्रात एका जहाजाला आग लागून तीन कर्मचारी अडकल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. 'रोहिणी' या पुरवठा करणाऱ्या जहाजाला दुपारी एक वाजण्याच्या सुमारास ही आग लागली असून एका क्रू मेंबर्सची जखमी अवस्थेत सुटका करण्यात यश आले असून इंजिन रूममध्ये अडकलेल्या इतर तिघांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू असल्याचे तटरक्षक दलाने म्हटले आहे.

जहाजावरील एका जखमी क्रू मेंबर्सला ओएनजीसीच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने वाचविण्यात यश आले असले तरी मुंबईत त्याच्यावर उपचार सुरू आहेत. हे तीन कर्मचारी इंजिन रूममध्ये अडकल्याने तसेच आगीच्या ज्वालांमुळे आत प्रवेश करणे कठीण असल्याने इतर तीन सदस्यांपर्यंत बचाव पथकाला पोहचण्यास अडचणी येत असल्याचे तटरक्षक दलाने म्हटले आहे.

# परभणीत पेट्रोलच्या शंभरीला तीन कमी

### प्रति लिटर किंमत ९७.०५ रुपयांवर



मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे पुन्हा एकदा देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या आहेत. राज्यात परभणीत लवकरच पेट्रोल शंभरी गाठण्याची चिन्हे असून शनिवारी परभणीत पेट्रोलच्या किमतीचा पारा पुन्हा एकदा चढला आहे. शनिवारी परभणीत पेट्रोलचा सर्वाधिक दर नोंदविण्यात आला असून प्रति लिटर किंमत ०.२९ पैशांनी वाढून ९७.०५ रुपयांवर पोहचली आहे.

राज्यात परभणीपाठोपाठ नांदेड येथे पेट्रोलच्या दरात भाववाढ झाली असून नांदेड येथील नागरिकांना प्रति लिटर पेट्रोलसाठी तब्बल ९६.९२ रुपये मोजावे लागत आहेत. तर बुलढाण्यात पेट्रोलचे दर ९६.३५ रुपयांवर पोहचले आहेत. अमरावतीत पेट्रोलचा दर ०.२९ पैशांनी वाढून ९६.२७ रुपयांवर पोहचला आहे. तर रत्नागिरी येथेदेखील पेट्रोलच्या किमतीत वाढ झाली असून रत्नागिरीत स्थानिकांना पेट्रोलसाठी प्रति लिटर ९६.१७ रुपये मोजावे लागत आहेत.

राज्यात अनेक ठिकाणी पेट्रोलच्या किमतीने नव्वदी गाठली असताना नवी मुंबईत मात्र पेट्रोलचा दर सर्वात कमी नोंदविण्यात आला आहे. सध्या नवी मुंबईत पेट्रोलसाठी ७६.१४ रुपये इतका दर असल्याने नवी मुंबईकरांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. तर पिंपरीमध्येदेखील पेट्रोलचा दर ७४.७३ रुपये असल्याचे दिसून आले आहे.


## इन्ट्रासॉफ्ट टेक्नॉलॉजीस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ५०२ ए, प्रथमेश, रघुवंशी मॉल कम्पाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०० ०१३.
दू. : ९१-२२-४००४-०००८. फॅक्स : ९१-२२-२४९०-३१२३, ई-मेल : intrasoft@itlindia.com,
संकेतस्थळ : www.itlindia.com CIN : L24133MH1996PLC197857

३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाहीकरता एकत्रीकृत अ-लेखापरीक्षित वित्तीय निकषांचा अहवाल

रु. लाखात

| | तपशील | तिमाही समाप्ती | | | नऊमही अखेर | | वर्ष अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१.१२.२०२० | ३०.०९.२०२० | ३१.१२.२०१९ | ३१.१२.२०२० | ३१.१२.२०१९ | ३१.०३.२०२० |
| | | (अ-लेखापरीक्षित) | (अ-लेखापरीक्षित) | (अ-लेखापरीक्षित) | (अ-लेखापरीक्षित) | (अ-लेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| | उत्पन्न | | | | | | |
| १ | प्रचलनामधून महसूल | १२२३२.९४ | १६७४३.१३ | १३८१५.२२ | ५०६७०.९३ | ४६६१५.२९ | ५९०६७.५४ |
| २ | अन्य उत्पन्न | २७०.१२ | १२५.८१ | १०३.८५ | ५९३.०५ | ३३०.१९ | ४८५.४२ |
| ३ | **एकूण उत्पन्न (१+२)** | **१२५०३.०६** | **१६८६८.९४** | **१३९१९.०७** | **५१२६३.९८** | **४६९४५.४८** | **५९५५२.९६** |
| | **खर्च** | | | | | | |
| | (ए) विक्री झालेल्या मालाचे मूल्य | ८२८२.१८ | ११८३३.१९ | १०३१९.७२ | ३५९५५.७४ | ३४४१४.२२ | ४३६४३.३७ |
| | (बी) शिपिंग आणि हॅण्डलिंग खर्च | १४५१.७० | १९२५.३२ | १०४९.७५ | ५७१२.१० | ४३६७.९२ | ५२५५.९२ |
| | (सी) विक्री आणि विपणन खर्च | १५७९.०७ | २१२३.५९ | १५४३.७३ | ६३८९.८२ | ५१९०.९० | ६६३७.९८ |
| | (डी) कर्मचारी लाभ खर्च | ४६०.५३ | ४३६.०६ | ४२०.८५ | १२६५.०१ | ११५८.४४ | १५६६.९२ |
| | (ई) वित्तव्यवस्था खर्च | ६४.३२ | ८१.७२ | १२५.६३ | २४३.३६ | ३९१.१८ | ५५३.८७ |
| | (एफ) घसारा आणि कर्जफेड तरतूद खर्च | ३८.३८ | १०३.३४ | १०२.४४ | २४७.७० | ३०२.२४ | ४०९.४३ |
| | (जी) इतर खर्च | ३०७.१७ | ३०२.३५ | २३४.५३ | ८६९.४७ | ८९९.८० | १२७२.२४ |
| ४ | **एकूण खर्च** | **१२१८३.३५** | **१६८०५.५७** | **१३७९६.६५** | **५०६८३.२०** | **४६७२४.७०** | **५९३३९.७३** |
| ५ | **कर पूर्व नफा (३-४)** | **३१९.७१** | **६३.३७** | **१२२.४२** | **५८०.७८** | **२२०.७८** | **२१३.२३** |
| ६ | **कर खर्च** | | | | | | |
| | (ए) चालू कर | २५.५९ | १७.१४ | ३.६२ | ७७.६१ | १६.१५ | ३९.२८ |
| | (बी) स्थगित कर | -२६.६३ | -१५.९८ | -३.०५ | -९५.६४ | -११.०४ | -३६.७४ |
| | (सी) प्राप्ती कर (अगोदरच्या वर्षाचा) | -७३.६५ | ०.०० | ०.०० | -७३.३६ | -०.१८ | -०.१८ |
| ७ | **कालावधीसाठी निव्वळ नफा (५-६)** | **३९४.४०** | **६२.२१** | **१२१.८५** | **६७२.१७** | **२१५.८५** | **२१०.८७** |
| ८ | **इतर समावेशक उत्पन्न** | | | | | | |
| | (१) नफा आणि तोट्याला नंतर पुनर्वर्गीकृत केले जाणार नाही त्या बाबी | | | | | | |
| | सेवायोजन उत्तर परिभाषित लाभ बंधनाचे पुनर्मापित लाभ | -५.५० | -५.५० | -२.७० | -१६.५० | -८.१० | -१०.७३ |
| | उपरक्तवरील प्राप्तीकर प्रभाव | १.४८ | १.४७ | ०.७३ | ४.४३ | २.१९ | २.९७ |
| | (२) नफा किंवा तोट्याला नंतर वर्गीकृत केले जाईल त्या बाबी | | | | | | |
| | ओसीआयद्वारे कर्ज रोख्यामध्ये गुंतवणुकीच्या उचित मूल्यावरील लाभ | ७.६३ | ८.०१ | ५.०२ | ३१.८० | १९.७० | ३.९१ |
| | विदेशी प्रचालनाच्या वित्तीय अहवालाच्या अनुवादावरील विनिमय फरक | -४६.२० | -१०२.९३ | २९.९७ | -१५१.५५ | ११७.०५ | ३६७.६९ |
| | उपरोक्तवरील प्राप्तीकर प्रभाव | -२.१३ | -२.२२ | -१.४० | -८.८५ | -५.४८ | -१.०९ |
| ९ | **सदर कालावधीसाठी एकूण समावेशक उत्पन्न (७+८)** | **३४९.६८** | **-३८.९६** | **१५३.४७** | **५३१.५०** | **३४१.२१** | **५७३.६२** |
| १० | **भरणा केलेले भाग भांडवल** (प्रत्येक रु.१० चे दर्शनी मूल्य, संपूर्ण भरणा केलेले) | **१४७३.१७** | **१४७३.१७** | **१४७३.१७** | **१४७३.१७** | **१४७३.१७** | **१४७३.१७** |
| ११ | **पुनर्मूल्यांकित राखीव वगळून राखीव / अन्य समन्याय** | | | | | | **१३३१६.१८** |
| १२ | **प्रती भाग मिळकत (इपीएस) (रु.)** मूलभूत आणि सोम्यीकृत इपीएस | २.६८ | ०.४२ | ०.८३ | ४.५६ | १.४७ | १.४३ |
| १३ | **एकत्रीकृत वित्तीय निष्कर्षावरील अतिरिक्त माहिती खालीलप्रमाणे आहे :** | | | | | | |
| | प्रचलनामधून महसूल | १९८.६६ | २०४.८० | १४५.०० | ६११.६५ | ४३०.७२ | ६९०.०६ |
| | करपूर्व नफा /(तोटा) | १४८.८६ | ८७.७४ | ५.०९ | ४१७.५० | ३६.०८ | १३८.३८ |
| | कर पश्चात नफा /(तोटा) | १५१.४७ | ८०.७४ | २.४९ | ४३०.०० | २४.८१ | ११८.८८ |

टीप :
१. हे एकत्रीकृत अ-लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष कंपनी (भारतीय लेखांकन मानक) अधिनियम, २०१६ द्वारे सुधारित कंपनीज (भारतीय लेखांकन मानक) अधिनियम, २०१५ सहवाचित कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") च्या कलम १३३ अंतर्गत अधिसूचीत भारतीय लेखांकन मानकानुसार तयार करण्यात आले आहेत. सदर निष्कर्षांचे लेखापरीक्षक समितीद्वारे पुनर्विलोकन करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाने त्यांच्या १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये संचालक मंडळाने मंजुरी दिली आहे.
२. कंपनीच्या सांविधिक लेखापरीक्षकाने ३१ डिसेंबर, २०२० समाप्त तिमाही आणि नऊमाहीच्या निष्कर्षांचे पुनर्विलोकन केले आहे. फेरबदल न केलेले निष्कर्ष वितरित करण्यात आले आहेत आणि उपरोक्त निष्कर्षांसह स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आले आहेत.
३. कंपनी कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत विनिर्देशित अनुसार कंपनी (भारतीय लेखांकन मानक) अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचीत अनुसार इंड एएस १०८ च्या आवश्यकतेनुसार, कंपनी इंटरनेट आधारित उत्पादन पोचवणी आणि सेवेच्या एकल व्यवसाय विभागामध्ये कार्यरत असल्यामुळे प्रकटनाची आवश्यकता नाही.
४. समूहाने, हे अंतरिम संक्षिप्त वित्तीय निष्कर्ष तयार करताना, वित्तीय आणि बिगर - वित्तीय मालमत्तांची वहनक्षम रक्कम समाविष्ट करून, कोविड - १९ संक्रमामुळे होणाऱ्या परिणामांची शक्यता विचारात घेतली आहे. सदर साथीच्या साथरोगामुळे जागतिक आर्थिक स्थितीमधील भविष्यातील संभाव्य अनिश्चितता संबंधित गृहितक विकसित करताना, सदर मालमत्तांची वहनक्षम रक्कम योग्य वेळेत पुनरप्राप्त करण्याच्या उद्देशाने, सदर अंतरिम संक्षिप्त वित्तीय निष्कर्षांच्या मंजुरीच्या तारखेला, क्रेडिट रिपोर्टस् आणि संबंधित माहिती आणि आर्थिक अंदाज आणि विशेषज्ञासह इंटरनेट आणि बाह्य स्त्रोतांचा उपयोग केला आहे.
५. भारतीय संसदेने सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० ला मंजुरी दिली आहे, जिचा प्रॉव्हिडंट फंड आणि गॅच्युइटीसाठी कंपनीद्वारे अंशदानावर प्रभाव पडेल. कार्मिक आणि समायोजन मंत्रालयाने सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० करता १३ नोव्हेंबर, २०२० रोजी मसुदा वितरित केला आहे आणि हितसंबंधितांकडून सूचना मागविल्या आहेत, ज्या मंत्रालयाद्वारे गांभीर्याने विचाराधीनतेमध्ये आहेत. होल्डिंग कंपनी आणि त्यांची भारतीय दुय्यम संस्था एकदा का सदर नियम अधिसूचीत झाला का त्याचा प्रसिध्द वित्तीय प्रभाव निर्धारणासाठी अदमास घेतील आणि मूल्यांकन करतील आणि ज्या कालावधीसाठी संहिता आणि त्याचे संबंधित नियम प्रभावी होईल, त्याचा त्याच्या वित्तीय अहवालाला योग्य प्रभाव देतील.
६. कंपनीचे ३१ डिसेंबर, २०२० अखेरचे तिमाही आणि नऊमाहीचे एकत्रिकृत वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या संकेतस्थळ www.itlindia.com वर उपलब्ध आहेत.

इन्ट्रासॉफ्ट टेक्नॉलॉजिस लिमिटेड करता
हस्ता/-
अरविंद कजारीया
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ००१०६९०१

(३१ डिसेंबर, २०२० रोजी समाप्त तिमाहीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष डाऊनलोड करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.)

स्थळ : कोलकाता
दिनांक : १२ फेब्रुवारी, २०२१